**ठळक बातम्या**

- भारतीय रिझर्व्ह बँकेचं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतलं पतधोरण जाहीर, रेपो दरात पाव टक्के कपात
- परदेशी बँकांना भारतात आकर्षक संधी उपलब्ध करून देत सरकार परकीय गुंतवणुकीला सक्रिय प्रोत्साहन देत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- पोर्तुगालचा दौरा आटोपून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्लोव्हाकियात दाखल
- नवकार महामंत्र दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन, नवी दिल्लीतल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांचा सहभाग

  **आणि**

- अमेरिकेत चिनी मालाच्या आयातीवर आजपासून १०४ टक्के शुल्क लागू

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेचं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतलं पतधोरण आज जाहीर झालं. बँकेच्या पतधोरण समितीनं रेपो दरात पाव टक्के कपात करून तो ६ टक्क्यांवर आणला आहे. यामुळे Standing Deposit Facility अर्थात स्थायी ठेव सुविधा दर पावणेसहा टक्के, तर Marginal Standing Facility अर्थात सीमांत स्थायी सुविधा दर आणि बँक दर सव्वासहा टक्के इतका राहील. पतधोरण समितीनं २०२५-२६ साठीचा सकल देशांतर्गत उत्पादनासाठीचा अंदाजित दर सहा पूर्णांक ७ दशांश टक्क्यांवरून साडेसहा टक्क्यांपर्यंत खाली आणल्याची माहितीही रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली आहे. या वर्षात देशाचा किरकोळ महागाई दर ४ टक्के राहण्याचा अंदाज असल्याचंही मल्होत्रा यांनी सांगितलं.

जागतिक अर्थव्यवस्थेसाठी या आर्थिक वर्षाची सुरुवात अस्वस्थतेत झाली असून त्यातल्या अस्थिरतेबाबत रिझर्व्ह बँक सावधपणे लक्ष ठेवून असल्याचं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अधोरेखित केलं. पतधोरणाबाबतची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले…..

**<u>होल्ड... बाईट- संजय मल्होत्रा</u>**

**<><><><><>**

भारत परदेशी बँकांना वाढीच्या आकर्षक संधी उपलब्ध करून देत असून सरकार बँकिंग क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला सक्रिय प्रोत्साहन देत असल्याचं केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. त्या लंडनमध्ये आयोजित भारत-यूके गुंतवणूकदार गोलमेज चर्चासत्रात बोलत होत्या. नव्या भारताला आकार देण्यासाठी धोरणात्मक नीतीबरोबरच सरकार शाश्वत आर्थिक विकास आणि गुंतवणूकीच्या संधी वाढवण्याला प्राधान्य देत असल्याचं त्यांनी सांगितलं. गुंतवणूक आणि व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी तसंच विविध परवानग्या घेण्याची औपचारिकता कमी करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे, असंही त्या म्हणाल्या. २०३२ पर्यंत भारत जगातला सहाव्या क्रमांकाचा विमा बाजारपेठ बनणार असल्याचं त्यांनी सांगितलं. स्वदेशी युनिकॉर्नच्या संख्येच्या बाबतीत भारत जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

भारत दौऱ्यावर आलेले दुबईचे उपप्रधानमंत्री युवराज शेख हमदान बिन मोहम्मद बिन रशीद अल मक़तूम यांनी आज मुंबई शेअर बाजाराला सदिच्छा भेट दिली. मुंबई शेअर बाजाराचे व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदररामन राममूर्ती यांनी युवराज अल मकतुम आणि त्यांच्या शिष्टमंडळाचं स्वागत केलं. तसंच स्टॉक एक्सचेंजच्या वाटचालीबाबत सविस्तर माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

बिम्सटेक देशांच्या कृषिमंत्र्यांची आज नेपाळची राजधानी काठमांडू इथं बैठक होत आहे. देशांमधील कृषिक्षेत्र फायदेशीर बनवणं आणि त्यासाठी परस्पर आदानप्रदान वाढवणं हा त्यामागचा हेतू असून याविषयी तज्ज्ञांच्या सहाय्यानं यामध्ये चर्चा आणि विचारविनिमय होणार आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली भारताचं प्रतिनिधिमंडळ या बैठकीत सहभागी होत आहे.

**<><><><><>**

‘प्रत्यक्ष कर विवाद से विश्वास’ या योजने अंतर्गत थकीत कर भरण्याची शेवटची मुदत ३० एप्रिल असल्याचं केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं एका अधिसूचने द्वारे जाहीर केलं आहे**.**

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पोर्तुगालचा यशस्वी राजकीय दौरा आटोपून आज सकाळी स्लोवाकियाची राजधानी ब्रातिस्लावा इथं पोहोचल्या. भारताच्या राष्ट्रपतींची स्लोव्हाकियाला २९ वर्षांनंतरची भेट आहे. या दौऱ्यात राष्ट्रपती मुर्मू स्लोवाकियाचे अध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा करतील. स्लोवाकियाचे प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांचीही त्या भेट घेणार असून स्लोवाकियाच्या संसदेचे अध्यक्ष रिचर्ड रासी यांच्याशीही चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

हवामान बदल हे आजचे सर्वात मोठं संकट असून जैन समुदायानं शतकानुशतके पाळलेली शाश्वत जीवनशैली हाच त्याचा उपाय असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथे नवकार महामंत्र दिवसानिमित्त आयोजित एका सभेला ते संबोधित करत होते.  भारताच्या इतिहासात आणि आध्यात्मिक प्रवासात जैन धर्माचं मोठं योगदान असून जैन साहित्य हे भारताच्या बौद्धिक वैभवाचा कणा आहे. नवकार महामंत्र हा जैन धर्मातल्या अहिंसा, नम्रता आणि आध्यात्मिक उन्नतीच्या तत्वांचा मंत्र आहे. महामंत्राचं महत्त्व फक्त आध्यात्मिक नसून ती जीवनाची गुरुकिल्ली आहे, असंही मोदी म्हणाले. या कार्यक्रमात १०८पेक्षा अधिक देशांतल्या लोकांबरोबर प्रधानमंत्र्यांनी नवकार महामंत्राचा जप केला.

**<><><><><>**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचं अधिवेशन आज गुजरातमधे साबरमती नदीच्या काठावर होत आहे. तिरस्कार, नकारात्मकता आणि निराशेचं वातावरण बदलून न्याय आणि संघर्षाच्या मार्गाने जाण्याचा निर्धार महासचिव सचिन पायलट यांनी व्यक्त केला. महात्मा गांधी यांनी काँग्रेस अध्यक्षपदाचा स्वीकरल्याला १०० वर्षं पूर्ण होत असून सरदार वल्लभभाई पटेल यांचं हे स्मृतीशताब्दी वर्ष असल्याचा उल्लेख त्यांनी यावेळी केला.

काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक काल गुजरातमध्ये अहमदाबाद इथं झाली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह दीडशे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पक्षाच्या पुनर्बांधणीबाबत चर्चा झाल्याचं काँग्रेसचे महासचिव के सी वेणुगोपाल यांनी वार्ताहरांना सांगितलं.

**<><><><><>**

अमेरिकेने चिनी मालाच्या आयातीवर आजपासून १०४ टक्के शुल्क लागू केलं आहे.  व्हाईट हाऊसच्या जनसंपर्क मंत्री  कॅरोलिन लेविट यांनी काल ही माहिती दिली. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेनुसार, चीनला ३४ टक्के निर्यात शुल्क वाढीचा सामना करावा लागणार होता. मात्र चीनने अमेरिकन उत्पादनांवर लागू केलेलं शुल्क न हटवल्यानं अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी चीनला लागू होणाऱ्या शुल्कात ५० टक्के वाढ केली आहे. त्यामुळे चीनकडून अतिरिक्त ८४ टक्के शुल्क आकारलं जाईल. त्याचबरोबर युरोपियन महासंघासह इतर डझनभर देशांना ११ टक्के ते ५० टक्क्यांपर्यंत नवीन कर शुल्क लागू होणार आहे.

**<><><><><>**

म्यानमाला झालेल्या विनाशकारी भूकंपातील मृतांची संख्या आता ती ३ हजार ६४५ वर पोचली आहे. एकंदर ५ हजार १७ लोक जखमी झाले असून, १४८ नागरीक अजूनही बेपत्ता असल्याची माहिती स्थानिक राज्य प्रशासनानं काल संध्याकाळी दिली आहे. २८ मार्चला झालेल्या भूकंपानंतर कालपर्यंत ९८ भूकंपाचे धक्के बसल्याचं म्यानमाच्या हवामानशास्त्र आणि जलविज्ञान विभागानं म्हटलं आहे. यामध्ये सागाइंग, मंडाले आणि मॅगवे या प्रमुख शहरांमधल्या ८० टक्क्यांहून अधिक इमारतींचं नुकसान झालं आहे. दरम्यान, भारताच्या ऑपरेशन ब्रह्मासह युरोपीय राष्ट्र, अमेरिका, संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय संघटनांनी म्यानमामध्ये मदत आणि बचाव पथकं पाठवली आहेत.

**<><><><><>**

अर्जेंटिनामध्ये सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वकरंडक स्पर्धेत, काल विजयवीर सिधू याने पुरूषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तुल प्रकारात भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. तर महिला श्रेणीत सुरूची सिंगनं १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक पटकावलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज गुजरात टायटन्सचा सामना राजस्थान रॉयल्सबरोबर होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर संध्याकाळी साडेसात वाजता खेळ सुरु होईल.

पंजाब किंग्जने काल चंडीगढमधे चेन्नई सुपरकिंग्ज संघाचा अठरा धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात लखनौ सुपर जायंटस् संघाने कोलकाता नाईट रायडर्सचा चार धावांनी पराभव केला.